# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ'

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपति शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर—४४० ००१ दुरध्वनी क्रमांक २५२९९३२ २५२२३९०


क्र.म.वि.वि./ १५६५ दिनांक:—०१/०८/२०१८.

प्रति,
प्राचार्य/अध्यक्ष/सचिव,
सर्व संलग्नीत महाविद्यालय,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ,नागपूर.

**विषय:— सत्र २०१९—२० चे निरंतर संलग्निकरण अर्ज सादर करण्याबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांना/अभ्यासक्रमांना निरंतर संलग्निकरणाची मान्यता सत्र २०१८—१९ पर्यंत आहे. अशा महाविद्यालयांकरिता सत्र २०१९—२० च्या निरंतर संलग्निकरणाकरिता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विद्यापीठाद्वारे तांत्रीक कारणांमुळे दिनांक ०१ ऑगस्ट २०१८ ऐवजी दिनांक ०७ ऑगस्ट २०१८ पासुन लिंक सुरू करण्यात येत असून संबंधीत महाविद्यालयांनी ३१ ऑगस्ट २०१८ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करून त्याची प्रत्यक्ष १ प्रत(हार्ड कॉपी) विद्यापीठाच्या महाविद्यालय विकास विभागात जमा करावी. विद्यापीठाद्वारे निर्गमित **निर्देश क्र. ८/२०१८** मधील तरतुदीनुसार प्रत्येक महाविद्यालयाच्या निरंतर संलग्किरणाची प्रक्रिया ही शैक्षणिक सत्र सुरू होण्यापुर्वी पुर्ण करून चालु सत्रात महाविद्यालयाला निरंतर संलग्निकरण आहे किंवा नाही तसेच सदर सत्रात विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचे आहे किंवा नाही याबाबतच्या सुचना सर्व संबंधीत महाविद्यालयांना शैक्षणिक सत्र सुरू होण्यापुर्वी विद्यापीठाला देणे गरजेचे आहे.

करिता संबंधीत महाविद्यालयांनी सत्र २०१९—२० करिता निरंतर संलग्निकरणाचा अर्ज दिनांक ०७ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०१८ पर्यंत ऑनलाईन **www.onlinedcudrtmnu.org** या संकेतस्थळावर न चुकता सादर करावा. दिनांक ३१ ऑगस्ट २०१८ नंतर लिंक सुरू करण्यात येणार नाही.

पुर्वीच्या निरंतर संलग्निकरणाच्या संकेतस्थळात बदल करण्यात आला असून **www.onlinebcudrtmnu.org** ऐवजी **www.onlinedcudrtmnu.org** असा नवा पत्ता संकेतस्थळाचा आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपला,

(डॉ. रमण मदने)
उपकुलसचिव(म.वि.वि.)
(अति.कार्य.)